**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६**

**<u>ठळक बातम्या</u>**

1. **भारत -अमेरिका व्यापार कराराचं सर्वत्र स्वागत /उद्योग जगतात आनंद.**
2. **युरोपीय देश आणि अमेरिकेबरोबरच्या व्यापार कराराचा मसुदा संसदेत सादर करावा अशी विरोधकांची मागणी.**
3. **मेळघाटातील पर्यटनाचा विकास 'ट्रॅक ॲण्ड ट्रेल'च्या माध्यमातून करण्यात येणार.**
4. **नागपूर महानगरपालिकेच्या प्रवर्तन विभागामार्फत सर्व झोनमध्ये अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू.**

**<u>व्यापार करार</u>**

**भारत-अमेरिका परस्पर शुल्क कपातीबाबतच्या व्यापार कराराचं विविध स्तरातून, विशेषतः उद्योग जगताकडून स्वागत होत आहे. महाराष्ट्र निर्यातीत अग्रेसर असून या करारामुळे राज्यातल्या व्यवसायासाठी नवं क्षितिज खुलं होईल, आणि राज्यात मोठी गुंतवणूक होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला. या करारामुळे उभय देशांमध्ये रोजगार निर्मिती, विकास आणि नवोपक्रमांना चालना मिळेल असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल, परिवहन मंत्री नितीन गडकरी, धर्मेंद्र प्रधान, किरेन रिजिजू, जे पी नड्डा इत्यादी केंद्रीय मंत्र्यांनी य़ा कराराचं स्वागत करणारे संदेश समाजमाध्यमावर लिहीले आहेत. भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या मालावरचं आयातशुल्क २५ टक्क्यांवरुन कमी करुन १८ टक्क्यांवर आणण्याचं, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी मान्य केल्याची, घोषणा आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर केली. ही भारताच्या जनतेची ताकद आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनीही याबाबत समाज माध्यमावर संदेश प्रसारित केला आहे.**

**सीआयआय**

CII (सीआयआय), फिक्की, रत्न आणि आभूषण उद्योग, पीएचडी CCI(सीसीआय), मोबाईल फोन्स, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि संलग्न उत्पादनांच्या निर्यातदारांची संघटना ICEA, मत्स्योत्पादकांची संघटना, अशा विविध उद्योजक आणि व्यापारी संघटनांनी या कराराबद्दल आनंद व्यक्त केला असून, यामुळे भारतीय उत्पादनांना अमेरिकेत उठाव मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

**संसद**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा एकदा चीनचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर झालेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी तीन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. राष्ट्रपतींनी आपल्या अभिभाषणात राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला. भारताचे चीन आणि पाकिस्तानशी असलेले संबंध अतिशय महत्त्वाचा विषय आहे, असं राहुल गांधी म्हणाले. यावेळी गांधींनी एका लेखाचा उल्लेख केला. त्यामुळे सत्ताधारी सदस्यांनी त्यांच्या भाषणात व्यत्यय आणला. गदारोळ वाढत गेल्यानं कामकाज तीन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्याआधी युरोपियन युनियन आणि अमेरिका यांच्यासोबतच्या व्यापार कराराचा मसुदा सभागृहाच्या पटलावर ठेवावा अशी मागणी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी दोन्ही सभागृहात केली.

**वडेट्टीवार**

चंद्रपूर महानगर पालिकेत संख्या बळाला घेऊन सध्या विविध चर्चा होत असताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी त्याबाबत स्पष्टता व्यक्त केली -

**रबी हंगाम**

देशात यंदाच्या रबी हंगामात पेरणी क्षेत्रात उल्लेखनीय वाढ झाल्याचं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. गेल्या महिन्याच्या ३० तारखेपर्यंत देशभरात सहाशे शाहत्तर (६७६)लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर पेरणी झाली आहे. ही पेरणी गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे १५ लाख हेक्टरनं अधिक आहे. यंदा

३३५ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर गहू, तर ४५ लाख हेक्टरवर भाताची पेरणी झाली आहे. डाळींच्या पेरणी क्षेत्रातही वाढ दिसून येत असून १३९ लाख हेक्टरवर डाळींची पेरणी करण्यात आली आहे. कृषी विभागाच्या अहवालानुसार भरड धान्यांची पेरणी ६१ लाख हेक्टर, तर ९७ लाख हेक्टर क्षेत्रावर तेलबियांची लागवड झाली आहे.

## हरित महाराष्ट्र

हरित महाराष्ट्रासाठी ३०० कोटी वृक्षलागवडीचं व्यापक अभियान राबवण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले आहेत. प्रस्तावित हरित महाराष्ट्र प्राधिकरणाच्या माध्यमातून या मोहिमेचा समन्वय साधला जाणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत झालेल्या आढावा बैठकीत पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर आधारित हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

## ट्रॅक ॲण्ड ट्रेल

अमरावती जिल्हा मेळघाटातील पर्यटनाचा विकास ‘ट्रॅक ॲण्ड ट्रेल’च्या माध्यमातून करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. जंगल भ्रमंती, ट्रेकिंग आणि साहसी पर्यटनासाठी सुरक्षित मार्ग विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी निवास, स्वच्छता व मूलभूत सुविधांचा दर्जा सुधारण्याच्या सूचना देण्यात आल्या. युवक, शालेय विद्यार्थी आणि समूह पर्यटकांना लक्षात घेऊन समाजमाध्यमां द्वारे प्रसिद्धी करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

## अस्थि दर्शन

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थिचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अंतिम दर्शन घेतले. त्यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या आत्म्याला शांती मिळो यासाठी गायत्री मंत्र तसेच महामृत्यूजय मंत्र

म्हणण्यात आले. माजी गृहमंत्री अनिल देशमुख, नगरसेविका आभा पांडे यांनी देखील त्यांच्या अस्थीकलशाचे दर्शन घेत पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

**ट्रान्सजेंडर हक्क**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात ट्रान्सजेंडर हक्क संरक्षण संवेदनशीलता एकदिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. लोकप्रशासन व स्थानिक स्वराज्य शासन विभाग आणि राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) कायदा २०१९, सामाजिक समावेशकता व कायदेशीर संरक्षण या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी समता व भेदभावमुक्त समाजनिर्मितीत विद्यापीठांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले.

**'पीएम ई-बस'**

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पीएम ई-बस' योजनेंतर्गत अकोला महापालिकेला ५० इलेक्ट्रिक बस मंजूर झाल्या आहेत. या बसेससाठी उभारण्यात येणाऱ्या ई-बस डेपो व चार्जिंग स्टेशनचे सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. खडकी भागात मोर्णा नदीकाठी १८ कोटी रुपयांत सुसज्ज डेपो उभारण्यात येत असून, येत्या चार ते पाच महिन्यांत अकोलेकरांना वातानुकूलित ई-बसने प्रवास करता येणार आहे. राज्यातील २३ महापालिकांमध्ये अकोला महापालिकेचाही या योजनेत समावेश आहे.

**अतिक्रमण निर्मूलन कारवाई**

शहरातील पादचारीमार्ग नागरिकांसाठी मोकळे करण्याच्या उद्देशाने नागपूर महानगर पालिकेच्या प्रवर्तन विभागामार्फत सर्व झोनमध्ये अतिक्रमण निर्मूलन कारवाई सुरू आहे. पायी चालणाऱ्या नागरिकांना सुरक्षित व मुक्त वावर मिळावा यासाठी ही मोहीम राबवली जात आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली झोन निहाय व मुख्यालय स्तरावर एकूण १५ चमू तैनात करण्यात आल्या आहेत. दुकानदार व फेरीवाल्यांनी

**पादचारी मार्गावरील अनधिकृत अतिक्रमण हटवून नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रवर्तन विभागाने केले आहे.**

**<u>महिला प्रीमियर लीग</u>**

**महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये,आज बडोदा इथल्या बीसीए मैदानावर गुजरात जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडे सात वाजता होईल. या सामन्यातील विजेत्या संघाची येत्या गुरुवारी अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुशी लढत होईल. स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखाली आरसीबी महिला संघानं लीग टप्प्यात अव्वल स्थान पटकावून अंतिम सामन्यातलं आपलं स्थान आधीच निश्चित केलं आहे**

**<u>रायफल शूटिंग</u>**

**भारतानं पुढील वर्षीच्या आशियाई रायफल शूटिंग अजिंक्यपद स्पर्धेचं यजमानपद मिळवलं आहे. ही स्पर्धा दिल्लीमध्ये होणार असून त्याच्या तारखा लवकरच निश्चित केल्या जातील, अशी माहिती राष्ट्रीय रायफल असोसिएशन ऑफ इंडियानं दिली आहे.**

**<u>धान खरेदी</u>**

**भंडारा जिल्ह्यात धान खरेदीचे उद्दिष्ट न वाढवल्याने शेतकऱ्यांचे धान अद्याप शिल्लक आहे. आतापर्यंत पणन विभागाने 31 लाख क्विंटल धान खरेदी केली असली तरी अनेक शेतकरी अडचणीत आहेत. उद्दिष्ट वाढविण्याच्या मागणीकडे शासन दुर्लक्ष करत असल्याने लाखांदूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयासमोर फटाके फोडो आंदोलन केले. सरकारला जाग येईल, अशी आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.**

*****